2 5 MAR 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधनाधारित प्रकाशने निर्माण व्हावीत

## डी. टी. शिर्के : एस. एस. महाजन यांच्या शोधनिबंध पुस्तिकेचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर :** संशोधकांनी शोधपत्रिकांमधून आपले शोधनिबंध प्रकाशित केले पाहिजेत, हे आवश्यक आहे. मात्र, प्रासंगिक शोधनिबंध प्रकाशनांच्या माध्यमातून आपले संशोधन समाजाला सादर करण्याचे महत्त्व डॉ. एस. एस. महाजन यांनी अधोरेखित केले आहे. अशा प्रकारे संशोधनाधारित उत्तम प्रकाशने अधिकाधिक प्रमाणात शिवाजी विद्यापीठातील संशोधकांकडून निर्माण व्हावी, अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी बुधवारी व्यक्त केली.



शिवाजी विद्यापीठात बुधवारी 'बिझनेस कॉरस्पाँडंट मॉडेल अँड इट्स रोल इन बँकिंग सेक्टर' या प्रासंगिक शोधनिबंध पुस्तिकेचे प्रकाशन कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

### व्यवसायदूत संकल्पना महत्त्वाची

आंतरराष्ट्रीय, खासगी बँकांचे जाळे देशभरात विस्तारताना ग्रामीण भारताच्या आर्थिक सबलीकरणासाठी व्यवसायदूत ही संकल्पना महत्त्वाची ठरली आहे. शेतकरी, महिला, विद्यार्थी आदी सर्वसामान्य ग्राहकापर्यंत बँकेच्या सेवांचे लाभ पोहोचविण्याच्या दृष्टीने ही चळवळ उपयुक्त आहे. त्याबाबत अधिक संशोधन करण्याची आवश्यकता असल्याचे प्र-कुलगुरु डॉ. पाटील यांनी सांगितले.

विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन यांनी लिहिलेल्या 'बिझनेस कॉरस्पाँडंट मॉडेल अँड इट्स रोल इन बँकिंग सेक्टर' या प्रासंगिक शोधनिबंधाच्या पुस्तिकेच्या प्रकाशनावेळी ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, ए. एम. गुरव उपस्थित होते. प्रा. महाजन यांनी प्रास्ताविक केले. के. व्ही. मारुलकर यांनी आभार मानले.

25 MAR 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात संशोधन पृथक्करण उपकरणे वापराची सुविधा

## राजेंद्र सोनकवडे : विविध १३ उपकरणे उपलब्ध; संशोधक विद्यार्थ्यांना पूर्वप्रशिक्षण देणार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या सामान्य सुविधा केंद्रामध्ये अत्याधुनिक संशोधन पृथक्करण उपकरणांची वापराची सुविधा उपलब्ध केली आहे. त्याचा संशोधकांसह विविध उद्योग-व्यवसायांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठ विज्ञान उपकरण केंद्र व सामान्य सुविधा केंद्राचे प्रमुख डॉ. राजेंद्र सोनकवडे यांनी बुधवारी केले.

विद्यापीठात युजीसीव्दारे सन १९७१ मध्ये विद्यापीठ विज्ञान उपकरण केंद्राची उभारणी झाली. याअंतर्गत सन १९८४ सामान्य सुविधा केंद्र सुरू झाले. प्रारंभी केंद्रात अवघी चार उपकरणे होती. सध्या येथे अत्याधुनिक, अद्ययावत अशी एकूण १३ उपकरणे आहेत. त्यामध्ये फॉरियर ट्रान्सफॉर्म इन्फ्रारेड स्पेक्ट्रोफोटोमीटर, गॅस क्रोमॅटोग्राफी- मास स्पेक्ट्रोमीटर, थर्मल ग्रॅव्हीमॅट्रीक- डिफरन्शियल, थर्मल एनालिसीस- डिफरन्शियल स्कॅनिंग कॉलॉरीमीटर, इंडक्टीव्हली कपल्ड प्लाझ्मा ऑप्टीकल एमिशन स्पेक्ट्रोस्कोप, मायक्रोवेव्ह डायजेस्टीव्ह सिस्टीम, पार्टीकल साइझ एनालायझर विथ झेटा पोटॅन्शियल, एक्स-रे डिफ्रॅक्टोमीटर, व्हेक्टर नेटवर्क अनालायझर, अल्ट्रा सेंट्रिफ्युज, बायो-एटॉमिक फोर्स मायक्रोस्कोप, मायक्रो-रामन स्पेक्ट्रोमीटर, एक्स-रे फोटोइलेक्ट्रॉन स्पेक्ट्रोस्कोप, ट्रान्समिशन इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोप यांचा समावेश आहे.

> या केंद्रात उपलब्ध असणारी वैशिष्ट्यपूर्ण उपकरणे संशोधक विद्यार्थ्यांसह उद्योग, कारखानदारी, तंत्रज्ञान क्षेत्रासाठी उपयुक्त आहेत. सामान्य सुविधा केंद्रात पृथक्करणासाठी ऑनलाईन नोंदणीची व्यवस्था करण्यात येणार आहे.
>
> \- डॉ. राजेंद्र सोनकवडे

2 5 MAR 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शेतकरी उत्पादनाच्या मार्केटिंगसाठी प्रयत्न

## महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पाटील यांची माहिती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शेतकऱ्यांच्या उत्पादनापेक्षा त्याच्या मार्केटिंगचा मोठा प्रश्न आहे. शेतकऱ्यांच्या उत्पादनाला बाजारपेठ कशी मिळेल, भाव कसे मिळतील, या दृष्टीने शेतकऱ्यांना एकत्रितपणे काम करण्याची आवश्यकता आहे. शेतकरी उत्पादनाच्या मार्केटिंगसाठी प्रयत्न केले जातील, असे राहूरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी.पाटील यांनी बुधवारी सांगितले. कुलगुरूपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर आज त्यांनी कोल्हापुरातील राजर्षी शाहू कृषी महाविद्यालयाला भेट दिली. महाविद्यालयाच्या अडीअडचणी त्यांनी जाणून घेतल्या. महाविद्यालयाच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर असल्याने त्याबाबत आवश्यक ती कार्यवाही केली जाईल असे यावेळी त्यांनी सांगितले. महाविद्यालयात ४० टक्के पदे रिक्त आहेत. संरक्षक भिंत नसल्याने उपद्रव मूल्य वाढत आहे, त्यातून साधन सामग्रीचे नुकसान होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

**शिवाजी विद्यापीठाबरोबर लवकरच सामंजस्य करार**

शिवाजी विद्यापीठाबरोबर लवकरच सामंजस्य करार केला जाईल, असेही सांगत डॉ. पाटील म्हणाले, याबाबत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची आज सकाळी भेट घेऊन चर्चा केली. विद्यापीठात कृषी विषयक संशोधन सुरू असते, त्याचा फायदा विद्यार्थ्यांना होईल, असेही त्यांनी सांगितले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजीराव शिंदे, सहयोगी संशोधन संचालक डॉ. उत्तमराव होळे उपस्थित होते.